॥ श्रीगणेशायनमः ॥ हॉटेल बळीराजा ॥ श्री दत्त कृपा ॥

फॅमिली गार्डन रेस्टॉरंट ॲण्ड फास्ट फूड

* साऊथ इंडियन * पंजाबी * चायनीज * तंदूर * महाराष्ट्रीयन

नाष्टा व जेवणाची उत्तम सोय

संपर्क : 8999854954, 8668738334

पत्ता : धुळे-सोलापूर हायवे, बिंदुसरा डॅम जवळ, मंझरी-कर्जनी फाटा, पाली बीड

सायं.दैनिक बीड प्रारंभ

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे

हॉटेल गौरव

रेस्टो बार, डिलक्स रूम

एसपी ऑफीससमोर, बार्शी रोड, बीड

प्रो.प्रा.नितीन खोड

एक वेळ आवश्य भेट द्या

बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ६ वे ■ अंक २५२ ■ गुरुवार दि. १९ नोव्हेंबर २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■पाने-४

Beed (Maharashtra) ■ Years-6 ■ Issu-252 ■ Thursday, 19 November -2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4

महावितरणमध्ये १३ कोटींचा घोटाळा! ६ अभियंते निलंबित

अधिवेशनात आवाज उठविणार-आ.विजयसिंह पंडित



प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : जिल्ह्यातील महावितरणच्या कामांची कंत्राटे वाटप आणि कामांमधील तब्बल १३ कोटी रुपयांपेक्षा अधिकच्या घोटाळ्याप्रकरणी अखेर मोठी कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात महावितरणचाया सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईच्या दणक्याने महावितरणच्या गोटात खळबळ उडाली आहे. गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी या घोटाळ्याविरोधात आक्रमक पवित्रा घेतला होता. हे प्रकरण लावून धरल्यानंतर नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, उपकार्यकारी अभियंता तसेच दोन सहाय्यक अभियंत्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

यापूर्वी महावितरणच्या बीड विभागीय कार्यालयात देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली १३.७० कोटी रुपयांच्या निधीवर कंत्राटदारांशी हातमिळवणी करून बोगस बिले व कमिशनबाजीतून कसा डल्ला मारला गेला, याचा पर्दाफाश 'सकाळ'ने केला होता. मुंबईतील विशेष चौकशी समितीने केलेल्या झाडाझडती आणि स्थळ पाहणीत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्यानंतर अखेर अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत आणि कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे यांच्यासह गेवराई तालुक्यातील ४ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

घोटाळ्याच्या चौकशी अहवालात जबाबदार धरण्यात आलेल्या प्रेमसिंग राजपूत (अधीक्षक अभियंता, बीड),सुबोध डोंगरे (कार्यकारी अभियंता, बीड), श्याम मोरे



(उपकार्यकारी अभियंता, गेवराई), शाम कुंभार (सहाय्यक अभियंता, उमापूर) चंद्रकांत प्रधान (सहाय्यक अभियंता, तलवाडा), महेंद्र गुंजाळ (कनिष्ठ अभियंता, सिरसदेवी) या सहा अधिकाराऱ्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

निलंबनाच्या कारवाईनंतर मूळ तक्रारकर्ते तथा गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी प्रशासनाला धारेवर धरले. ही कारवाई केवळ वरवरची असून एकाच तालुक्यापुरती मर्यादित आहे. पाटोदा, शिरूर कासारसह जिल्ह्यातील इतर भागांतही असाच गैरप्रकार झाला असून, अनेक बड्या अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, या संपूर्ण महाघोटाळ्याचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय आणि दोषींवर कठोर कारवाई केल्याशिवाय मी शांत बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

या कारवाईनंतर एकट्या गेवराईपुरती कारवाई न ठेवता पाटोदा, शिरूर आणि अन्य तालुक्यांतील कामांचीही सखोल चौकशी होणार का? तसेच केवळ निलंबनावर न थांबता या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करून वसुली केली जाणार का? याकडे आता संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

शिंदे गटाच्या एन .सी. शायना हिच्या प्रतिमेस शिवसेनेच्या वतीने जोडे मारुन केले दहन

बीड । प्रतिनिधी

शिंदे गटाची एन.सी. शायना हिने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे साहेब यांचा फोटो फाडल्यालयाची बातमी महाराष्ट्रात व देशात पसरली व संपूर्ण राज्यात निष्ठावंत शिवसैनिकांना प्रचंड वेदना झाल्या व संपूर्ण राज्यात वातावरण तापले याच अनुषंगाने बीड जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्हा मध्यवर्ती कार्यालय सिद्धी विनायक कॉमलेकस बीड येथे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख गोरख अण्णा



सिंघन व अल्पसंख्याक महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शेख यासमीन बाजी यांच्या प्रमुख उपस्थितीत संतप्त पदाधिकारी व शिवसैनिक यांनी एन.सी. शायना हिच्या प्रतिमेस जोडे मारुन दहन के ले.व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धव ठाकरे साहेब तुम आगे बढो हम तुमहारे साथ है, शिवसेना जिंदाबाद, नालायक शायना हिच करायचं काय खाली मुंडके वर पाय , शिंदे गट हाय हाय अशी जोरदार घोषणाबाजी के ली. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर म्हणाले की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे आमचं निष्ठावंत शिवसैनिकांच दैवत आहे व या दैवताचा फोटो शिंदे गटाची एक जिम्मेदार एन.सी. शायना हि फाडते यावरूनच सिद्ध होत आहे की , खरी शिवसेना कुणाची आहे, निष्ठावंत शिवसैनिक असे नीच काम करुच शकत नाही, हिम्मत असेल तर व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना तुम्ही मानत असाल तर तडकाफडकी शायना हिची पक्षातून हकालपट्टी का केली नाही असा संतप्त सवाल वरेकर यांनी केला.

उसाच्या ट्रॉलीला ट्रॅव्हल्सची जोरदार धडक; चार जण गंभीर जखमी

बीड । प्रतिनिधी

बीड शहराजवळ मध्यरात्रीच्या सुमारास राधिका ट्रॅव्हल्स आणि उसाने भरलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये भीषण अपघात झाला. बीडहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एमएच ०३ डीव्ही ९७४४ क्रमांकाच्या राधिका ट्रॅव्हल्सची म्हसोबा फाटा परिसरात उसाच्या ट्रॉलीला जोरदार धडक बसली. या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले असून, त्यापैकी एका जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राधिका ट्रॅव्हल्स (क्रमांक एमएच ०३ डीव्ही ९७४४) ही बीड येथून मुंबईच्या दिशेने प्रवास करत होती. दरम्यान, बीड शहरापासून जवळच



असलेल्या म्हसोबा फाटा परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास ट्रॅव्हल्सची उसाने भरलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला जोरदार धडक बसली. धडक इतकी भीषण होती की ट्रॅव्हल्सचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

अपघात घडताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर जखमींना तातडीने बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या जखमींवर उपचार सुरू असून, चार जणांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. त्यापैकी एका जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

दरम्यान, अपघातानंतर संबंधित ट्रॅव्हल्स आणि ट्रॅक्टर पोलिसांनी बीड येथील पोलीस मुख्यालयात आणून लावले आहेत. अपघात नेमका कशामुळे झाला, ट्रॅव्हल्सचा वेग किती होता आणि चालकाचा निष्काळजीपणा कारणीभूत होता का, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.

या अपघातामुळे रात्रीच्या प्रवासातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलींना योग्य सुरक्षा व्यवस्था आणि आवश्यक दर्शनी दिवे असणे किती महत्त्वाचे आहे, हे या घटनेतून अधोरेखित झाले आहे. म्हसोबा फाटा परिसरातील या अपघाताने बीडमध्ये खळबळ उडाली असून, जखमींच्या प्रकृतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अजितदादांच्या अखेरच्या १४ महिन्यातील विमान प्रवासाची आकडेवारी समोर

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती विमानतळावजवळ झालेल्या एका भीषण विमान अपघातात मृत्यू झाला होता. अजितदादांच्याया अपघाती मृत्यूबाबत तेव्हापासूनच अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. तसेच त्यांचे पुतणे रोहित पवार यांनी हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय वारंवार व्यक्त केला आहे. त्यावरून रोहित पवार यांनी व्हीएसआर या विमान कंपनीवरही गंभीर आरोप केले होते. दरम्यान, आता अजित पवार यांनी त्यांच्या जीवनातील



शेवटच्या १४ महिन्यांत केलेल्या विमान प्रवासाबाबतची आकडेवारी समोर आली असून, त्यामधून दादांनी प्रवासासाठी व्हीएसआर कंपनींच्या विमानांच्या केलेल्या वापराबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे.

अजित पवार यांच्या शेवटच्या १४ महिन्यांतील विमान प्रवासाची आकडेवारी सादर करणारं वृत्त एबीपी माझाने प्रसारित केलं असून, या वृत्तानुसार अजित पवार यांच्याकडून विमान प्रवासासाठी नेहमीच व्हीएसआर कंपनीच्या विमानांना प्राधान्य दिलं जात असे.

आ. विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून बीड शहरात अडीच कोटींच्या विकास कामांचा शुभारंभ

नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, समन्वयक शेख मुजीब यांची प्रमुख उपस्थिती

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.सुनेत्रावहिणी अजित पवार यांच्या नेतृत्वखाली आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून बीड नगर परिषदेला विकास कामांसाठी भरीव निधी मिळत असून शहरातील नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शहरात एकूण २ कोटी ५० लाख रुपयांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ आ. विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, बीड विधानसभा समन्वयक शेख मुजीब,



सभापती निजाम शेख, स्थायी समिती सदस्य अमर नाईकवाडे, सभापती संजय उडान य़ाच्यासह मान्यवर उपस्थित होते.

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांनी बीड शहराला भरीव निधी उपलब्ध करून शहरामध्ये विविध विकासाचे कामे दर्जेदार करून बीड शहराचा कायापालट करण्याचा शब्द दिला होता. स्व.अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतील विकास कामांना राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. सुनेत्रावहिणी पवार यांच्याकडून भरीव निधी मंजुर केला जात आहे. आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून विकास कामांना मंजुरी मिळावी म्हणून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. यातूनच शहरात एकुण २ कोटी ५० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बीड ◀◀ पान २ वर

पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांमुळे स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी - मंत्री पंकजा मुंडे

योजनांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार शुभारंभ

मुंबई । प्रतिनिधी

पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या २१ योजनांचा ऑनलाइन पोर्टलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या महिन्यात शुभारंभ करण्यात येणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.



पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव एन. रामस्वामी, सहआयुक्त तसेच विविध अधिकारी उपस्थित होते.

पशुसंवर्धन मंत्री मुंडे म्हणाल्या, शेळी-मेंढी गटांचे वाटप, दुधाळ गायी-म्हशींचे संगोपन आणि कुक्कुटपालन यांसह विविध व्यवसायांसाठी या योजनांमधून निधी व शासनाचे अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनांमुळे शेतकरी, बेरोजगार युवक-युवती आणि महिलांना स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पशुसंवर्धन विभागाने महाआयटीच्या समन्वयातून ऑनलाइन पोर्टल विकसित केले आहे. इच्छुक अर्जदारांना 'महा आयडी' तयार करून या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करता येईल. पोर्टलवर मराठीतूनही अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध असेल. राज्य शासन नऊ योजना, जिल्हा वार्षिक योजनेतील नऊ योजना आणि अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या माध्यमातून तीन योजनांसाठी निधी देण्यात येईल असे पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी सांगितले.

दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन आणि चारा उत्पादनासाठी विविध प्रकल्प

विभागाच्या वतीने यावेळी सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना, भज-क प्रवर्गासाठीच्या योजना, नऊ राज्यस्तरीय योजना, जिल्हा वार्षिक योजनेतील नऊ योजना आणि अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास

◀◀ पान २ वर

नांदूरघाटच्या सरपंच सुनीता जाधव अपात्र

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील नांदूरघाट ग्रामपंचायतीच्या सरपंच सुनिता युवराज जाधव यांना सरपंच पदावरून अपात्र ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांमध्ये १ कोटी ३ लाख ८९ हजार ४८० रुपयांच्या आर्थिक अनियमिततेचे प्रकरण समोर आल्यानंतर छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी १७ नोव्हेंबर रोजी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला.

नांदूरघाट येथील ग्रामरोजगार सेवक शेख सादिक दिलावर यांनी सरपंच सुनिता जाधव यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी करून अहवाल सादर केला. त्यामध्ये मनरेगा अंतर्गत झालेल्या २६ रस्त्यांच्या कामांपैकी १३ कामांच्या मोजमाप पुस्तिका उपलब्ध नसल्याचे आढळले. तर आठ रस्त्यांवर प्रत्यक्ष काम झाले नसतानाही खर्च नोंदविण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. या आठ कामांमधील ५९ लाख ४६ हजार ४१३ रुपये, तर अन्य १२ रस्त्यांच्या कामांमध्ये वितरित रक्कम आणि प्रत्यक्ष खर्चातील ४४ लाख ४३ हजार ६७ रुपयांची तफावत वसुलपात्र असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

अशा प्रकारे एकूण १ कोटी ३ लाख ८९ हजार ४८० रुपयांची अनियमितता निदर्शनास आली. याशिवाय, दोषी पदाधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून १ कोटी ३ लाख ८९ हजार ४८० रुपयांची रक्कम संबंधितांकडून व्याजासह वसूल करावी, तसेच प्रस्तावित फौजदारी कारवाई पूर्ण करावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

विभागीय आयुक्तांच्या या निर्णयामुळे केज तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली असून नांदूरघाट ग्रामपंचायतीच्या कारभारावर आता प्रशासनाची पुढील भूमिका काय राहणार, याकडे लक्ष लागले आहे.

३३ लाख रुपये भरूनही कारवाई

या प्रकरणात सरपंच सुनिता जाधव यांनी २८ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रामपंचायतीच्या खात्यावर २२ लाख रुपये आणि ११ लाख १५ हजार १४७ रुपये असे एकूण ३३ लाख १५ हजार १४७ रुपये जमा केले होते. मात्र, रक्कम जमा केल्याने जबाबदारी संपत नसल्याचे निरीक्षण विभागीय आयुक्तांनी नोंदविले. कामांच्या समर्थनार्थ देयके, मोजमाप पुस्तिका आणि काम पूर्णत्वाची प्रमाणपत्रे यांसारखे आवश्यक पुरावेही सादर करण्यात आले नसल्याचे आदेशात नमूद आहे.

अधिकारी-कर्मचाऱ्यांवरही कारवाईचे निर्देश

विभागीय आयुक्तांनी सरपंचांना हलगर्जीपणा, कर्तव्यात कसूर आणि सार्वजनिक निधीच्या अपहार प्रकरणातील जबाबदारीच्या अनुषंगाने चालू कालावधीसाठी अपात्र घोषित केले आहे. तसेच संबंधित तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी आणि शाखा अभियंत्यांविरुद्ध निलंबनाची प्रस्तावित कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. ग्रामरोजगार सेवक, तांत्रिक अधिकारी आणि संबंधित सीडीईओ यांच्याविरुद्धही प्रस्तावित कारवाई पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

आयोगावर प्रश्नांचा मारा

देशभरातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल तपासणीच्या (एसआयआर) निर्णय प्रक्रियेवरून विरोधी पक्ष आणि निवडणूक आयोग यांच्यातील वाद दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत चालला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सुरुवातीपासूनच याबाबत आक्रमक भूमिका घेतली असून सोमवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेत निवडणूक आयोगाला ४८ लेखी प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. इतकेच नव्हे, तर मुख्य निवडणूक आयुक्त आणि अन्य निवडणूक आयुक्तांनी त्याची प्रतिज्ञापत्राद्वारे उत्तरे द्यावीत, अशी मागणीही राहुल गांधी यांनी केली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील दाव्यांची पडताळणी करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांसह अन्य दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी, तसेच उपनिवडणूक आयुक्त यांच्यासह संबंधित अधिका-यांना ४८ प्रश्न विचारण्याची संधी द्यावी, अशी मागणी 'इंडिया' आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.मतदान माहिती

एसआयआर प्रक्रियेत अधिकृत मान्यता देण्याची पद्धत, मतदारांची कथित वगळणी आणि आयोगाच्या ऑनलाईन मतदार नोंदणी प्रणालीमध्ये करण्यात आलेले बदल या मुद्यांवर स्पष्टीकरण मागण्यात आले आहे. देशव्यापी विशेष सखोल तपासणीचा निर्णय निवडणूक आयोगाने सामूहिकरीत्या घेतला होता की, अन्य निवडणूक आयुक्तांना माहिती न देता, त्यांची मान्यता किंवा सहमती न घेता मुख्य निवडणूक आयुक्तांनी आयोगाचे अधिकार वापरले, असा सवाल याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. सध्याचा अर्ज मंजूर करून याचिकाकर्त्यांना प्रतिवादींकडे संबंधित प्रश्नावली पाठवण्याची परवानगी द्यावी तसेच प्रश्नांमध्ये नमूद केलेल्या संबंधित व्यक्तींनी प्रतिज्ञापत्राद्वारे उत्तरे द्यावीत. उत्तरांमध्ये उल्लेख केलेल्या कागदपत्रांच्या प्रती जोडण्यात याव्यात.मतदान माहिती

कोणत्याही कागदपत्राबाबत गोपनीयतेचा किंवा विशेषाधिकाराचा दावा असल्यास, त्याची कारणे प्रत्येक कागदपत्रासाठी स्वतंत्रपणे नमूद करावीत, जेणेकरून न्यायालयाला त्यावर निर्णय घेता येईल. न्यायालयाच्या परवानगीने एका पक्षकाराने दुस-या पक्षकाराला माहिती मिळवण्यासाठी लेखी स्वरूपात विचारलेल्या प्रश्नांना 'इंटरोगेटरीज' (प्रश्नावली) असे म्हणतात. मुख्य निवडणूक आयुक्त आणि आयोगाच्या निर्णयाविरोधात दाखल याचिकांवर निवडणूक आयोगाने २४८ पानांचे उत्तर सादर करून एसआयआर प्रक्रियेचे समर्थन केले आहे. अर्ज क्रमांक ६ मध्ये कोणताही बदल करण्यात आल्याचा आरोप फेटाळताना, मतदार नोंदणीसाठी वापरण्यात येणा-या वैधानिक अर्जामध्ये कोणताही बदल केला नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. पात्र व्यक्तीला मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज क्रमांक ६ भरावा लागतो, असे आयोगाने म्हटले आहे. निवडणूक आयोगावर आरोप करण्याचा प्रयत्न दुर्दैवी आहे, असे आयोगाच्या वतीने उपनिवडणूक आयुक्त भानू प्रकाश येतुरू यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.मतदान माहिती

देशव्यापी एसआयआर प्रक्रियेला अधिकृत मान्यता देणारा आयोगाचा कोणताही नोंदवलेला निर्णय उपलब्ध नसणे, ऑनलाईन अर्ज क्र. ६ मध्ये करण्यात आलेले बदल तसेच ईसीआयनेट आणि ईआरओनेट या मतदार यादींच्या डेटाबेसची कार्यपद्धती यावरही याचिकाकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रणाली केंद्रीकृत आणि पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. एसआयआरच्या निर्णय प्रक्रियेबाबत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त आणि संबंधित अधिका-यांना विचारण्यासाठी याचिकेत ४८ प्रश्नांची यादी देण्यात आली आहे. आयोगाच्या ऑनलाईन पोर्टलमध्ये करण्यात आलेल्या सुधारणा आणि बदलांची माहिती तसेच हे बदल करण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तींची नावेही उघड करण्याची मागणी करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज क्र. ६ मध्ये घोषणापत्राचा समावेश करण्यात आल्याची बाब निवडणूक आयोगाने मान्य केल्याचा संदर्भ याचिकेत देण्यात आला आहे. मात्र, हे बदल करण्यास कोणत्या व्यक्तीने परवानगी दिली, याची माहिती आयोगाच्या उत्तरात देण्यात आलेली नाही, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची संवेदनशीलता, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची तत्परता!

तांदळवाडी घाट तलावातील अवैध पाणी उपशाला आळा घालण्यासाठी तातडीने हालचाली

बीड । प्रतिनिधी

दुष्काळ आणि संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील प्रशासन अधिक सतर्क झाले असून , नागरिकांना आणि शेतकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये , तसेच उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन आणि संवर्धन व्हावे , यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या संवेदनशील नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाने पाणीटंचाईच्या प्रश्नाला गांभीर्याने घेतले असून , तालुका स्तरावरही अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या जात आहेत . विशेष म्हणजे , प्रशासकीय कामकाज केवळ कार्यालयीन बैठका आणि कागदोपत्री सूचनांपुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष क्षेत्रभेटी , नागरिकांशी संवाद आणि समस्यांच्या मुळाशी जाऊन उपाययोजना करण्यावर भर दिला जात असल्याचे दिसून येत आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात . दिवाळीसारख्या सणाच्या कालावधीतही त्यांनी विविध ठिकाणी भेटी देऊन शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या . केवळ समस्या ऐकून घेणे एवढ्यावर न थांबता संबंधित यंत्रणांना सूचना देऊन त्या प्रश्नांची सोडवणूक होते की नाही , याकडेही त्यांचे लक्ष असते . प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारे प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेतली जात असल्याने जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणेलाही अधिक जबाबदारीने काम करण्याची दिशा मिळत आहे . सध्या पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध पाणी जपणे , त्याचा विनाकारण अपव्यय रोखणे आणि सार्वजनिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही प्रशासनासह प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी बनली आहे . याच दृष्टिकोनातून बीड जिल्ह्यातील प्रशासनाकडून पाणीटंचाईच्या प्रश्नावर गांभीर्याने पावले उचलली जात आहेत .

जिल्हाधिकाऱ्यांच्या या कार्यपद्धतीला बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची तत्परता आणि क्षेत्रीय स्तरावरील कामकाजावर असलेले लक्ष यांची जोड मिळत असल्याचे चित्र आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे म्हणणे ऐकून घेणे , त्याची समस्या समजून घेणे आणि नियमानुसार त्यावर योग्य तोडगा काढण्याचा प्रयत्न करणे , हा त्यांच्या कामकाजाचा महत्त्वाचा भाग असल्याचे दिसून येते . महसूल प्रशासन हे थेट सर्वसामान्य नागरिकांशी संबंधित असल्याने नागरिकांची कामे वेळेत होणे , त्यांना विनाकारण कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत आणि शासनाच्या योजनांचा लाभ पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचावा , यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या अनुषंगाने विविध बैठका घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे . जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी



जितीन रहेमान , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्यासह संबंधित अधिकारीही या प्रयत्नांमध्ये सक्रिय असल्याचे दिसून येते . पाणीटंचाईच्या काळात प्रत्येक विभागाने आपापली जबाबदारी ओळखून समन्वयाने काम करणे आवश्यक आहे . जलसाठ्यांचे संरक्षण , टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन , नागरिकांच्या तक्रारींची दखल आणि पाण्याच्या अनधिकृत वापरावर नियंत्रण या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे . वरिष्ठ स्तरावरून दिल्या जाणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी गावपातळीपर्यंत प्रभावीपणे व्हावी , यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके हे मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रणेशी सातत्याने संपर्क ठेवत असल्याचे त्यांच्या कार्यपद्धतीतून स्पष्ट होते.बुधवार , दिनांक १८ रोजी तांदळवाडी घाट येथील तलावातील पाण्याचा अवैधरित्या उपसा होत असल्याची माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना मिळाली . पाणीटंचाईच्या संभाव्य परिस्थितीत सार्वजनिक जलसाठ्यातील पाण्याचा अनधिकृत उपसा होणे ही गंभीर बाब असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी या माहितीची तातडीने दखल घेत बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना संबंधित ठिकाणी लक्ष घालून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या . जिल्हाधिकाऱ्यांकडून सूचना प्राप्त होताच तहसीलदार शेळके यांनी कोणताही विलंब न करता तांदळवाडी घाट सजेचे ग्राम महसूल अधिकारी पंकज शिरसकर आणि ग्रामपंचायत अधिकारी जगदीश कडू यांना तातडीने आवश्यक सूचना केल्या . त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनीही तत्परता दाखवत तलावाच्या ठिकाणी भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली . तलावातील उपलब्ध पाण्याचा अवैधरित्या उपसा होणार नाही आणि सार्वजनिक जलसाठ्याचे संरक्षण होईल , यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याच्या दृष्टीने त्यांनी लक्ष केंद्रित केले . पाणीटंचाईच्या काळात एखाद्या गावातील तलाव , बंधारा किंवा अन्य सार्वजनिक जलस्रोत हा केवळ त्या ठिकाणापुरता मर्यादित विषय नसतो , तर तो परिसरातील नागरिक , जनावरे आणि शेतीच्या गरजांशी संबंधित असतो . त्यामुळे अशा जलसाठ्यांमधील पाण्याचा वापर जबाबदारीने होणे अत्यंत गरजेचे आहे . उपलब्ध पाण्याचा अनधिकृत उपसा रोखण्यासाठी स्थानिक प्रशासनाने सतर्क राहणे आणि कोणत्याही प्रकारची गैरप्रकाराची माहिती मिळताच त्वरित दखल घेणे आवश्यक आहे . तांदळवाडी घाट येथील प्रकरणात जिल्हाधिकारी स्तरावर माहितीची दखल घेतली जाणे , तहसीलदारांकडून तत्काळ स्थानिक अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जाणे आणि संबंधित यंत्रणेकडून प्रत्यक्ष तलावाला भेट देऊन पाहणी केली जाणे , ही प्रशासनातील समन्वय आणि तत्परतेची बाब ठरली आहे . विशेषतः पाणीटंचाईच्या काळात अशा प्रकारच्या जलस्रोतांच्या संरक्षणाला प्राधान्य देण्याची गरज असून , प्रशासनाने घेतलेली ही भूमिका महत्त्वपूर्ण मानली जात आहे. एकूणच , बीड जिल्ह्यात दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासन अधिक सतर्कतेने काम करत असल्याचे चित्र आहे . वरिष्ठ स्तरावरून मिळणाऱ्या सूचनांची प्रत्यक्ष गावपातळीवर अंमलबजावणी होणे , जलस्रोतांचे संरक्षण करणे , पाण्याचा अनधिकृत उपसा रोखणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे या बाबींना प्रशासनाकडून प्राधान्य दिले जात आहे . तांदळवाडी घाट येथील तलावाच्या पाण्याच्या अनधिकृत उपशाबाबत मिळालेल्या माहितीची जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेली तातडीची दखल आणि तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्थानिक अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचना , यामुळे प्रशासकीय यंत्रणेतील समन्वयाचे महत्त्व पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे . त्याचप्रमाणे मांजरसुंबा येथील तलाठी कार्यालयाला दिलेली भेट आणि अधिकारी कर्मचाऱ्यांना केलेले मार्गदर्शन यामुळे महसूल विभागातील कामकाज अधिक शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न दिसून येतो . दुष्काळाच्या काळात प्रशासनाची खरी कसोटी ही केवळ पाणीटंचाईच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर उपाययोजना करण्यात नसून , संभाव्य समस्या आधीच ओळखून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यामध्ये असते . सार्वजनिक जलसाठ्यांचे संरक्षण , टँकर प्रस्तावांवर वेळेत निर्णय , नागरिकांच्या महसुली कामांचा निपटारा आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे या सर्व बाबींचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची संवेदनशील भूमिका आणि तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची कामातील तत्परता यामुळे बीड तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणेला अधिक सक्रियपणे काम करण्याची दिशा मिळत आहे . आगामी काळातही अशाच प्रकारे प्रशासनाने सतर्क राहून उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन केले , नागरिकांच्या प्रश्नांना वेळेत न्याय दिला आणि गावपातळीवरील यंत्रणा अधिक जबाबदारीने कार्यरत ठेवली , तर पाणीटंचाईच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी निश्चितच मदत होईल . प्रशासनाच्या या सक्रिय भूमिकेमुळे दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून , आता या उपाययोजनांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी होणे तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

पान १/४ वरून

पवनचक्की कंपन्यांच्या

करण्याच्या धमक्या देणे.

५) महसूल व पोलीस यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीररीत्या जमिनीचे अधिग्रहण सुरू असल्याचा आरोप.

शासन निर्णयाची अंमलबजावणी कोण करणार?

जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांकडून संनियंत्रण समित्यांकडे दुर्लक्ष; समित्या कागदावरच असल्याचा डॉ. गणेश ढवळे यांचा आरोप!

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने २१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवनऊर्जा प्रकल्पांसाठी जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व उपविभागीय स्तरावर संनियंत्रण समित्या स्थापन करण्याबाबत शासन आदेश काढला आहे.

या समित्यांमध्ये जिल्हाधिकारी अध्यक्ष, तर पोलीस अधीक्षक व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य आहेत. उपविभागीय स्तरावरील समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी, तर तहसीलदार सचिव आहेत.

पवनऊर्जा प्रकल्पांशी संबंधित जमीन व्यवहारांची कायदेशीर तपासणी करणे, शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळतो की नाही याची खात्री करणे, प्राप्त तक्रारींची चौकशी करून कारवाई करणे तसेच शेतकरी, ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यात समन्वय ठेवणे ही या समित्यांची प्रमुख जबाबदारी आहे. मात्र, प्रत्यक्षात या संनियंत्रण समित्या अस्तित्वात असूनही त्यांचे कामकाज प्रभावीपणे होत नसल्याचे चित्र आहे. जिल्हा प्रशासन, महसूल व पोलीस प्रशासनाकडे तक्रारी करूनही शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्याने कंपन्यांचे मनोबल वाढत असल्याचा आरोप डॉ. गणेश ढवळे यांनी केला.

शासनाने तातडीने संनियंत्रण समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन शेतकऱ्यांच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी, बेकायदेशीर कामांना आळा घालावा आणि दोषींवर कारवाई करावी. अन्यथा शेतकऱ्यांचा संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रीय

छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, बीड येथे पार पडलेल्या जलतरण स्पर्धेत बीड जिल्ह्याच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत *७ सुवर्ण, ६ रौप्य व १ कांस्य अशी एकूण १४ पदके* पटकावली. या कामगिरीच्या जोरावर बीड जिल्ह्याने जलतरण प्रकारातील जनरल चॅम्पियनशिप पटकावली. पोलीस हवालदार दिलीप गिते यांनीही जलतरण स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

वैयक्तिक क्रीडा प्रकारात ४ बाय १०० मीटर महिला रिले स्पर्धेत बीडच्या महिला संघाने प्रथम क्रमांक मिळविला. उंच उडी महिला गटात उमा इंगळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. पुरुषांच्या उंच उडी स्पर्धेत बीडच्या खेळाडूंनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविले. गोळाफेक महिला गटात सोनाली तांदळे यांनी सुवर्णपदक मिळविले. महिला बास्केटबॉल स्पर्धेतही बीड जिल्ह्याच्या संघाने विजय संपादन केला. फुटबॉल स्पर्धेत बीड व जालना संघांमधील सामना २-१ अशा गोलफरकाने जालना संघाने जिंकला.

या स्पर्धेमुळे विविध पोलीस घटकांतील अधिकारी व अंमलदारांना आपले क्रीडाकौशल्य दाखविण्याची संधी मिळत असून खिलाडूवृत्ती, शिस्त, संघभावना आणि परस्पर समन्वय वृद्धिंगत होत आहे. बीड पोलीस दलाच्या वतीने आयोजित या स्पर्धेतील विविध क्रीडा प्रकारांच्या लढती दि. १५ ते २१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहेत.

त्रिपुरारी पौर्णिमा, गुरुनानक

हे विनम्र आवाहन..!!

पान १/४ वरून

आयोजक : तुम्ही आम्ही समस्त शिवप्रेमी- शिवभक्त बीडकर

आयोजन दिन :

दि. २४ नोव्हेंबर २०२६, वार शुभ मंगळवार रोजी संध्या. ४.०० वाजता... एक नवा भक्तिमय इतिहास घडविण्याची संधी आपल्याला मिळत आहे.

२४ नोव्हेंबर २०२६, शुभ मंगळवार रोजी मंगलमय कार्तिक पर्व समाप्ती काल सायंकाळी ४.०० वाजल्यापासून महाशिव महाआरती होणार असून, हजारो दिव्यांच्या प्रकाशाने श्री क्षेत्र कंकालेश्वर मंदिराचा परिसर उजळून निघणार आहे.

हा केवळ दिव्यांचा उत्सव नाही, तर आपल्या श्रद्धेचा, संस्कृतीचा, धार्मिक परंपरेचा आणि बीडकरांच्या एकजुटीचा सोहळा आहे. म्हणूनच समस्त बीडकरांना मनापासून आवाहन आहे

चला तर बंधु-भगिनींनो, या कार्तिक पौर्णिमेस कार्तिक पर्वाच्या शुभ समाप्ती काळात घरापुरती 'देव दिवाळी' मर्यादित न ठेवता आपल्या आराध्य दैवताच्या चरणी भक्तीचा दीप प्रज्वलित करूया.

आपल्या माता-भगिनी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक आणि लहान बालगोपाळांसह संपूर्ण कुटुंबाने या महादीपोत्सवात सहभागी व्हावे.

प्रत्येकाने एक दिवा लावावा, श्रद्धेने प्रज्वलित करावा आणि आपल्या सहभागातून हजारो दिव्यांचा प्रकाश निर्माण करावा.

आपली उपस्थिती हीच या सोहळ्याची खरी ताकद आहे. आपला सहभाग हीच या महादीपोत्सवाची खरी शोभा आहे!

एक दिवा भक्तीचाएक दिवा श्रद्धेचाएक दिवा संस्कृतीचा.. एक दिवा आपल्या बीडच्या वैभवाचा!

सुरक्षिततेचे आवाहन :

महादीपोत्सवात सहभागी होताना लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी. दीप प्रज्वलित करताना सुरक्षित अंतर ठेवावे आणि सर्वांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

दिनांक : मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६

वेळ : सायंकाळी ४.०० वाजता

स्थळ : श्री क्षेत्र कंकालेश्वर महादेव मंदिर, बीड.

बीडकरांनो, चला तर मग

आपल्या श्रद्धेची ताकद दाखवूया, एकजुटीचा संदेश देऊया आणि हजारो दिव्यांच्या प्रकाशात शिवनगरी बीडचा आध्यात्मिक वारसा उजळवूया ! समस्त बीडकरांनी सहकुटुंब, सहपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक महादीपोत्सवाचे साक्षीदार व्हावे, ही नम्र विनंती! हर हर महादेव! जय शिवशंकर!

आ. विजयसिंह पंडित यांच्या

नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, बीड विधानसभा समन्वयक शेख मुजीब, सभापती निजाम शेख, स्थायी समिती सदस्य अमर नाईकवाडे, सभापती संजय उडान, नगरसेवक रंजीत बनसोडे, मनोज गोडसे, प्रमोद शिंदे, भैय्यासाहेब मोरे, महेश राऊत, इकबाल भाई शेख, शाहिद पटेल, प्रभाकर पोपळे, आनंद पवार, गजानन जवकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, बीड शहरातील नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा अधिक चांगल्या स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी विकासकामांना सातत्याने गती देण्यात येईल. शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेली कामे प्राधान्याने मार्गी लावण्याचा आपला प्रयत्न राहील, असा विश्वास यावेळी आमदार विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला. या दोन्ही विकासकामांमुळे संबंधित परिसरातील नागरिकांची रस्ते व पाणी निचऱ्याची समस्या दूर होण्यास मदत होणार आहे. कामे नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी आमदार

पान १/४ वरून

विजयसिंह पंडित यांनी संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना दिल्या.

विकास कामांमध्ये सिमेंट रस्ते आणि नाली बांधकामाच्या दोन महत्त्वपूर्ण कामांचा समावेश आहे. अहिल्यादेवी होळकर पुतळा ते थीगळे नाना यांच्या घरापर्यंत १ कोटी रुपये खर्चाच्या सिमेंट रस्ता व नाली बांधकामाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच प्रभाग क्रमांक २२ मधील नरसोबा नगर येथे माऊली हॉस्पिटल ते सनी गायकवाड यांच्या घरापर्यंत १ कोटी ५० लाख रुपये खर्चाच्या सिमेंट रस्ता व नाली बांधकामालाही प्रारंभ करण्यात आला. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक

महामंडळाच्या तीन योजनांचा समावेश आहे.

राज्यस्तरीय योजनांमध्ये पाच दुधाळ गायी किंवा म्हशींचा प्रकल्प, ५० शेळ्या किंवा मेंढ्या व पाच नरांचा प्रकल्प, पाच हजार अंडी देणाऱ्या कुक्कुट पक्ष्यांचा प्रकल्प, तीन हजार ते पाच हजार मांसल कुक्कुट पक्ष्यांचा प्रकल्प, आठवड्याला एक हजार अंडी उबविण्याची क्षमता असलेले यंत्र, पाच माद्या व एक नर यांचा वराहपालन गट, मुरघास संयंत्र आणि पशुसंवर्धन कर्जावरील व्याज सवलतीचा समावेश आहे.

जिल्हा वार्षिक योजनांमध्ये एक किंवा दोन दुधाळ जनावरांच्या गटाचे वाटप, पाच शेळ्या किंवा मेंढ्या व एक नर तसेच दहा शेळ्या किंवा मेंढ्या व एक नर अशा गटांचे वाटप, ५०० कुक्कुट पक्ष्यांचे वाटप, हायड्रोपोनिक चारा उत्पादन आणि मिनी टीएमआर उपकरणासाठी अनुदान आदी योजनांचा समावेश आहे. अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या योजनांमध्ये राजे यशवंतराव होळकर महामेष योजना, चराई यांचा समावेश आहे.

शिंदे गटाच्या एन .सी. शायना

पुढे बोलताना ते म्हणाले की, शायना हिच्या प्रतिमेस आज आम्ही जोडे मारले आहेत पण शायना बीड जिल्हात जर आली तर इथला निष्ठावंत शिवसैनिक तिला समोरासमोर जोड्यानी मारल्याशिवाय रहाणार नाही, विशेषतः आमच्या मुस्लिम शिवसैनिक भगिनी स्वतः हुन मोठ्या संख्येने हजर राहून शायना हिला शिक्षा झालीच पाहिजे अशी संतप्त मागणी करत आहेत. या जोडे मारो आंदोलनाला युवा सेनेचे उपजिल्हाधिकारी अशपाक भाई शेख तालुका सचिव नंदुभाऊ येवले, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, तालुका सहसचिव संदिप भानप, युवासेना बीड तालुका माजी युवा अधिकारी अनिल माने ,गजू शिंदे , सय्यद शबाना,शेख ईरफाना,शेख रहिना, शेख समीन,कचराबाई वाघमारे,हावडाबाई गायकवाड, दिक्षा सोनवणे, तेजस्वी लोंढे,शितल वाघमारे यांच्यासहित शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजितदादांच्या अखेरच्या

तसेच त्यांनी अखेरच्या १४ महिन्यांच्या काळातील विमानप्रवासापैकी ८० टक्के प्रवास हा व्हीएसआर कंपनीच्या विमानांमधून केला होता, अशी माहिती या आकडेवारीमधून समोर आली आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या झालेल्या अपघाती निधनानंतर त्यांचे पुतणे रोहित पवार यांच्याकडून या अपघाताबाबत सातत्याने संशय घेतला जात आहे. तसेच रोहित पवार यांनी अजित पवार अखेरच्या वेळी ज्या विमानातून प्रवासाला निघाले होते. त्या विमान कंपनीच्या कारभाराबाबत वारंवार अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच या विमान कंपनीला आणि तिच्या मालकांना वाचवलं जात असल्याचा आरोपही रोहित पवार यांनी केला आहे.

दुष्काळी परिस्थितीत उपयोजना रोजगार जलसंधारणा कामासाठी योग्य नियोजन करावे -जिल्हाधिकारी मित्तल

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देणे, जलसंधारणाच्या कामांना गती देणे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना दिलासा देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पुढाकार घेतला आहे. यासाठी सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन आणि रोजगारनिर्मितीच्या कामांचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. जिल्हाधिकारी मित्तल यांनी आज (दि. १७) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठक घेतला. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी सहायक, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर



यांनी ९ नोव्हेंबर रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार महसूल प्रशासनाच्या पुढाकाराने लोकसहभागातून सामूहिक विवाह सोहळे आयोजित करण्यात येणार आहेत. यासाठी पात्र व इच्छुक वधू-वरांची नोंदणी करून लाभार्थ्यांची यादी तयार करावी. तसेच विवाह सोहळ्यांचे दिनांक व स्थळ निश्चित करून आवश्यक साहित्य आणि सुविधांचे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी मित्तल यांनी दिल्या.आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे, एकल पालक असलेली कुटुंबे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील वधू-वरांना या उपक्रमात प्राधान्य द्यावे. लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योगसमूह आणि दानशूर नागरिकांच्या सहभागातून हे सोहळे आयोजित करण्यावर भर देण्यात आला.दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील मजुरांना गावातच रोजगार मिळावा, यासाठी तइ-ऋ ठ-च् ऋ अंतर्गत उपलब्ध तरतुदी आणि मार्गदर्शक सूचनांनुसार कामांचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. रोजगाराची मागणी लक्षात घेऊन आवश्यक कामे तातडीने सुरू करावीत, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. यामध्ये चारा लागवड, जलसंधारणासाठी गाळ काढणे आणि अन्य आवश्यक कामांना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रत्येक गावात किमान २०० जलतारा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तसेच १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्रलंबित कामे प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामविकास अधिकारी यांनी गावातील रोजगाराची मागणी, उपलब्ध कामे आणि नवीन कामांचे प्रस्ताव याबाबत समन्वय साधावा. गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांनी परस्पर समन्वय ठेवून कामांची अंमलबजावणी व प्रगतीवर लक्ष ठेवावे, असे निर्देशही देण्यात आले.

दुष्काळाचा सामना करण्यासाठी रोजगारनिर्मिती, चारा उपलब्धता, जलसंधारण आणि सामाजिक उपक्रमांची एकत्रित अंमलबजावणी आवश्यक आहे. सर्व विभागांनी समन्वयाने आणि कालबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करावीत. गरजू नागरिकांना रोजगारासह आवश्यक सुविधा आणि सामाजिक आधार मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, संबंधित यंत्रणांनी या कामांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

राजर्षी शाहू विद्यालयात वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षण सुरळीत सुरु

शिक्षकांचा प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग

वडवणी । प्रतिनिधी



प्राथमिक शिक्षक तसेच पदवीधर प्राथमिक शिक्षकांची १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झाल्यानंतर त्यांना चटोपाध्याय वेतनश्रेणीचा लाभ मिळण्यासाठी वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक असते. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडे ऑनलाईन पध्दतीने नोंदणी केलेल्या शिक्षकांसाठी राजर्षी शाहू विद्यालय, साळींबा रोड वडवणी येथे दि.१३ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दहा दिवसीय वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हे प्रशिक्षण नियोजनबध्द व सुरळीतपणे सुरु असून यास शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे.

या प्रशिक्षणाचा शुभारंभ दि.१३ नोव्हेंबर २०२६ रोजी वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी व डायट, अंबाजोगाईच्या अधिव्याख्याता देशपांडे मॅडम यांच्या उपस्थितीत झाला. प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यात वाढ करणे, शैक्षणिक गुणवत्ता वृध्दिंगत करणे तसेच आधुनिक शैक्षणिक पध्दती आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास शिक्षकांना सक्षम बनविणे हा प्रमुख उद्देश आहे. प्रशिक्षणाचे वेळापत्रक सकाळी ९:३० ते सायंकाळी ५:३० असे निश्चित करण्यात आले आहे. प्रशिक्षणाच्या प्रत्येक तासिकेला प्रशिक्षणार्थी शिक्षकांची ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने उपस्थिती नोंदविण्यात येत आहे. एखादा प्रशिक्षणार्थी शिक्षक एका तासिकेला गैरहजर राहिल्यास त्याची पुढील तासिकेची ऑनलाईन उपस्थिती नोंदविण्यात अडचण येते. त्यामुळे सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षकांना वेळेचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थ्यांसाठी पूर्वचाचणी, तंत्रज्ञानावर आधारित स्वाध्याय, विविध चाचण्या, मूल्यमापन आणि उत्तरचाचणी यांचे नियोजन सुलभकांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. या प्रक्रियेव्दारे शिक्षकांच्या अध्ययन निष्पत्तीचे व प्रशिक्षणातील सहभागाचे मूल्यमापन केले.

जाणार आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक प्रशिक्षणार्थी शिक्षकाला नवोपक्रम व कृती संशोधन प्रकल्प पूर्ण करणे अनिवार्य आहे. यावेळी गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीनुसार शिक्षकांनी आपले ज्ञान, कौशल्ये आणि अध्यापन पध्दती अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षण हे केवळ वेतनश्रेणीच्या लाभापुरते मर्यादित नसून शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी आणि अध्यापनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे सर्व शिक्षकांनी प्रशिक्षणातील प्रत्येक सत्रात सक्रिय सहभाग घ्यावा, वेळेचे काटेकोर पालन करावे आणि प्रशिक्षणातून मिळणाऱ्या ज्ञानाचा प्रत्यक्ष शालेय कामकाजात उपयोग करावा. प्रशिक्षणातील सर्व उपक्रम गांभीर्याने पूर्ण करुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. या प्रशिक्षणास तालुक्यातील केंद्रप्रमुख, विषयतज्ज्ञ, विशेष शिक्षक तसेच वरिष्ठ अधिकारी भेट देवून प्रशिक्षणाचा आढावा घेत आहेत. प्रशिक्षणाचे समन्वयक म्हणून चिंचवणचे केंद्रप्रमुख रणजीत शिंदे काम पाहत आहेत, तर तांत्रिक सहाय्यक म्हणून विषयतज्ज्ञ सय्यद उबैदुल्लाह जबाबदारी सांभाळत आहेत.

घाटनांदूर येथे मानाच्या शिवछत्रपती चषक क्रिकेट स्पर्धेचा थरार रंगणार

घाटनांदूर । प्रतिनिधी



घाटनांदूर येथे क्रीडाप्रेमींसाठी आनंदाची पर्वणी ठरणाऱ्या 'मानाचा शिवछत्रपती चषक' भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन छत्रपती क्रिकेट संघ घाटनांदुर यांच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मैदान या ठिकाणी करण्यात आले आहे या क्रिकेट स्पर्धेचे १७ नोव्हेंबर मंगळवार रोजी सकाळी १० वाजता प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून या स्पर्धेचे उद्घाटन म्हणून मा. आमदार संजय भाऊ दौंड यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष गोविंद देशमुख यांच्यासह प्रमुख उपस्थिती बाळासाहेब देशमुख,दत्ता जाधव, रामभाऊ वैद्य,उत्सव जाधव,अविनाश भारती, दिगंबर जाधव, नरसिंग जाधव, पत्रकार संजय रानभरे, धनंजय जाधव, परमेश्वर वैद्य, गोविंद जाधव, महेंद्र गोदाम, विशाल जाधव, शिरूभाऊ आरसुडे, मुक्तार शेख,योगेश काबरे, मुर्तुजा शेख,शिवाजी चव्हाण,वामन जाधव यांच्यासह छत्रपती क्रिकेट संघातील सदस्य तसेच अनेक क्रिकेट प्रेमीसह मोठ्या उपस्थित उद्घाटन करण्यात आले.या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांना आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. प्रथम पारितोषिक गोविंद देशमुख यांच्या वतीने ५१ हजार १११ रुपये, द्वितीय पारितोषिक राजेश्वर चव्हाण यांच्या वतीने ३१ हजार १११ रुपये, तृतीय पारितोषिक शिवाजीराव सिरसाट यांच्यावतीने २१ हजार १११ रुपये तर, चतुर्थ पारितोषिक उत्सव जाधव यांच्या वतीने ११ हजार १११ रुपये ठेवण्यात आले आहे.

३६ शेतकऱ्यांची आधुनिक शेतीतून यशस्वी भरारी!

परळी। प्रतिनिधी

दुष्काळ, पाण्याची कमतरता आणि आर्थिक अडचणींवर मात करत आधुनिक शेतीच्या माध्यमातून समृद्धीचा मार्ग खुला होऊ शकतो, याचे प्रेरणादायी उदाहरण अंबाजोगाई तालुक्यातील मांडवा पठाण गावाने घालून दिले आहे. पारंपरिक कापूस आणि सोयाबीन शेती करणाऱ्या येथील ३६ शेतकऱ्यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहकार्याने केळी लागवडीचा नवा प्रयोग केला. आज त्यांच्या शेतातील केळी विदेशात निर्यात होत असून, शेतकऱ्यांना लाखोंचे उत्पन्न मिळू लागले आहे.यंदाच्या अत्यल्प पर्जन्यमानामुळे मराठवाड्यातील शेतकरी भीषण दुष्काळाचा सामना करत असताना मांडवा पठाणच्या शेतकऱ्यांनी निराशेला बळी न पडता शेतीत परिवर्तनाचा मार्ग स्वीकारला. जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्लोबल विकास ट्रस्टने गावात नदी पुनरुज्जीवन, जीआरए शाफ्ट उभारणी आणि फळबाग लागवडीच्या माध्यमातून विकासाची पायाभरणी केली. शेतकऱ्यांना आधुनिक आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या शेतीकडे वळविण्यासाठी संस्थेने सातत्याने सहकार्य केले. तसेच यापुढेही संस्थेचा संपर्क असलेल्या गावांमध्ये जलतारा सारखे प्रभावी जलसंधारणाचे काम केले जाणार आहे.

केळी लागवडीसाठी भांडवलाची अडचण ओळखून ए. यू. स्मॉल फायनान्स बँकेच्या माध्यमातून ३६ शेतकऱ्यांना प्रत्येकी १ लाख २० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. उच्च दर्जाची केळी रोपे अल्प दरात देण्यासोबतच बांधावर जाऊन निःशुल्क मार्गदर्शन करण्यात आले. दुष्काळात उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करता यावा, यासाठी मोफत ठिबक सिंचन संचही वितरित करण्यात आले. आर्थिक मदत, तांत्रिक मार्गदर्शन आणि पाणी व्यवस्थापनाच्या या एकत्रित सहकार्यामुळे शेतकऱ्यांचा केळी लागवडीचा प्रयोग यशस्वी झाला.शेतीतील उत्पादनाला योग्य बाजारपेठ आणि भाव मिळणे ही मोठी अडचण असते.



ग्लोबल विकास ट्रस्टचे योगदान!

मांडवा पठाण येथील शेतकऱ्यांच्या यशामागे ग्लोबल विकास ट्रस्टचे मोठे योगदान आहे. फळबाग लागवडीसाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे, इच्छुक शेतकऱ्यांना अनुदानित उच्च दर्जाची रोपे देणे, शेतकऱ्यांना निःशुल्क निवासी आणि अनिवासी तांत्रिक मार्गदर्शन करणे, सिंचनाच्या सोयीसाठी ठिबक सिंचन संच मोफत उपलब्ध करून देणे, भांडवली अडचण असलेल्या शेतकऱ्यांना ए. यू. स्मॉल फायनान्स बँकेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे, निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी आवश्यक तांत्रिक सहकार्य करणे, तसेच शेतकऱ्यांनी पिकवलेल्या केळीला योग्य बाजारपेठ व भाव मिळवून देण्यासाठी थेट निर्यातदारांसोबत जोडणी करून देण्यापर्यंतचे योगदान संस्थेच्या मार्फत देण्यात येते. याचबरोबर नदी पुनरुज्जीवन आणि जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर झाल्याने शेतीसाठी पाणी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

ग्लोबल विकास ट्रस्टचे सहकार्य आणि शेतकऱ्यांच्या कष्टातून साकारलेली ही यशोगाथा मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण आणि प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

भगवानगड परिसरात पाण्याची आणीबाणी

टंचाईचे टँकर गावात न येता परस्पर विकल्याचा आरोप ?

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यावर दुष्काळाचे भीषण सावट पडलेले असताना माहे जून महिन्यापासून पाण्याचा एक थेंब सुद्धा बरसला नाही यामुळे यावर्षी नदी नाले ओढे विहिरी तलाव तळे झरे कोरडे ठक पडले आहेत विहिरींनी तळ गाठल्याने पाण्याचा अंश सुद्धा पाहायला मिळत नाही अशातच पाच ते सहा महिन्यांपासून टंचाईचे पाण्याची टँकर पाथर्डी तालुक्यातील १०७ ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वाडी वस्ती तांडे पाड्यावर पोहोचत आहेत.

तालुका तहसील व पंचायत समिती प्रशासनाकडून प्रत्येक गावात व कुटुंबाला टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे अतोनात प्रयत्न सुरू आहेत पाथर्डी तालुक्यातील बहुतांश ऊसतोड मजूर कामगार महाराष्ट्रात इतर जिल्ह्यात ऊस तोडण्यासाठी कारखान्यावर गेल्याने पाण्याची तीव्रता व दाहकता तशी



जाणवत नसली तरीही पशुधन वाचवणे व रोजच्या दैनंदिन वापरासाठी व पिण्यासाठी पाण्याची टंचाई मात्र भीषण जाणवत आहे त्यामुळे येणाऱ्या जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात ऊसतोड मजूर कारखान्याहून परत येतील तेव्हा पाणी टंचाई व चारा याची तीव्रता वाढणार आहे यामुळे दुष्काळाशी दोन हात करणे पशुधन वाचवणे व मुबलक पाणीपुरवठा मिळण्यासाठी शासन प्रशासनाची कसोटी लागणार आहे.

भगवानगड परिसरातील भालगाव पट्ट्यात असलेल्या खरवंडी कासार मालेवाडी या गावांमध्ये प्रति दोन ते तीन टँकर मंजूर असून दिवसात चार ते पाच टँकरच्या खेपा होतात परंतु तरीही लोकांना मुबलक पाणी मिळत नसल्याने मोठा आक्रोश निर्माण झाला आहे टँकरच्या खेपा येतात परंतु पाणी मिळत नाही यामुळे सायंकाळी येणारे टँकर परस्पर खाजगी विहिरीत पाणी टाकले जाते किंबहुना खाजगी आस्थापना व व्यापारी यास विकले जाते असा संशय व आरोप लोक करू लागले आहेत.

खरवंडी कासार मालेवाडी या गावात गेल्या पाच दिवसापासून काही गावातील मारुती मंदिर आणि इतर असलेल्या वस्तीवर पाणी मिळत नसल्याने टँकरची परस्पर विल्हेवाट लावली जाते की काय असा दाट संशय निर्माण होत आहे यामुळे पाथर्डी पंचायत समिती टंचाई विभागाकडून टँकरला जीपीएस बसवून गावातील ग्रामसेवक व पाणीपुरवठा कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून टँकर मालेवाडी गावात व इतरत्र वाडी वस्तीवर प्रत्येक कुटुंबाला पाणी देण्यासाठी नियोजन करण्याची मागणी होत आहे.

जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांची रेवगाव येथे क्षेत्रभेट

विविध उपक्रमांची पाहणी व ग्रामस्थांशी संवाद

जालना। प्रतिनिधी

जालना तालूक्यातील रेवगाव येथे जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी आज क्षेत्रभेट देऊन गावातील विविध विकासात्मक व सामाजिक उपक्रमांची पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान त्यांनी प्रारंभिक बालविकास (एउऊ) उपक्रमांतर्गत सहभागी मातांच्या घरी भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला तसेच अंगणवाडी केंद्राला भेट देऊन माता, अंगणवाडी सेविका व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.यावेळी मातांचे मानसिक आरोग्य, स्तनपान, बालसंगोपन आणि कुटुंबातील सदस्यांचा सहभाग या विषयांवर चर्चा करण्यात आली. उपक्रमामुळे मातांना मिळणारा भावनिक आधार, गृहभेटींच्या माध्यमातून होणारे मार्गदर्शन आणि कुटुंबपातळीवर होत असलेले सकारात्मक बदल याबाबत माहिती घेण्यात आली.



तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी स्वामी समर्थ केंद्र, आरोग्य उपकेंद्र आणि प्रगतिशील शेतकरी यांच्या शेतीला भेट देऊन तेथील उपक्रमांची पाहणी केली. शेती, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासाच्या क्षेत्रात स्थानिक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या विविध प्रयत्नांची त्यांनी माहिती घेतली.या क्षेत्र भेटीदरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या. विविध शासकीय उपक्रमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, नागरिकांचा सहभाग आणि स्थानिक पातळीवरील सकारात्मक बदल यांचा आढावा घेणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता.बालकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी माता, पिता आणि संपूर्ण कुटुंबाला सक्षम करणे, तसेच ग्रामविकासासाठी स्थानिक पातळीवरील चांगल्या उपक्रमांना प्रोत्साहन देणे, या दृष्टीने ही क्षेत्रभेट महत्त्वपूर्ण ठरली.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande (E-mail-prarambh2023@gmail.com

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे

सायं.दैनिक
बीड
प्रारंभ
गुरुवार दि. १९ नोव्हेंबर २०२६
4



इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याच्या निर्णयामुळे पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना मिळाला मोठा आधार



महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशनने मानले ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार

मुंबई । प्रतिनिधी

पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशन या विद्यार्थी संघटनेने राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची आज भेट घेऊन आभार मानले. ना. पंकजाताईंच्या या निर्णयामुळे राज्यातील पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना फार मोठा आर्थिक आधार मिळाला असल्याची प्रतिक्रिया असोसिएशनने यावेळी व्यक्त केली.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या पशुवैद्यक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आंतर्वासिता निर्वाह भत्यात सात हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. त्या अगोदर महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी यासंदर्भात ना. पंकजाताई मुंडे यांची मंत्रालयात भेट घेऊन इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन ना. पंकजाताईंनी हा विषय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडला होता.

ना. पंकजाताईंमुळे मिळाला न्याय

इंटर्नशिप भत्त्यात वाढ करावी अशी मागणी गेल्या कित्येक महिन्यापासून आम्ही करत होतो पण ना.पंकजाताई मुंडे यांच्या एका निर्णयामुळे आम्हाला न्याय मिळाला अशी भावना स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष दिनेश रत्नपारखी यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप भत्ता अकरा हजार रुपये दिला जात होता पण आता या निर्णयामुळे त्यांना दरमहा अठरा हजार रुपये निर्वाह भत्ता मिळणार आहे. यामुळे आनंदित झालेल्या राज्यातील विविध पशुवैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या शिष्टमंडळाने आज ना. पंकजाताईंची रामटेक निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे आभार मानले.

यावेळी स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष रत्नपारखी यांच्यासह प्रणव पाटील, सुहाना रैना, प्रतिक सुवर्णकार, पवन राठोड, शिवरत्न वायकर, विशाल निंगोरे, वैष्णवी घुगे, जान्हवी ढोले, मैथिली गायकवाड, पुष्कर आनंदगावकर, शुभम वाडेकर, माधवी झेपाडे, दक्षिता नगिने आदी विद्यार्थी उपस्थित होते.

ढेकणमोहा पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉ. ससाने-इंगोले यांनी पदभार स्वीकारला; ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयात डॉ. ससाने-इंगोले मॅडम यांनी पदभार (चार्ज) स्वीकारल्यानंतर गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ढेकणमोहा परिसरातील पशुपालक शेतकऱ्यांना जनावरांच्या आरोग्यविषयक समस्या, उपचार तसेच पशुसंवर्धनाच्या विविध बाबींसाठी पशुवैद्यकीय दवाखान्याची महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे डॉ. ससाने-इंगोले मॅडम यांच्या नियुक्तीमुळे परिसरातील पशुपालकांना चांगल्या आरोग्यसेवा मिळतील, अशी अपेक्षा



ग्रामस्थांनी व्यक्त केली. यावेळी माजी सरपंच नागेश शिंदे, भगवान देवकते, उपसरपंच परमेश्वर थापडे, ग्रामपंचायत सदस्य नारायण देवकते, प्रभूसिंह ठाकूर, शरद देवकते, पत्रकार विनोद शिंदे, जगतसिंग ठाकूर, माऊली देवकते, दिलीप शिंदे, महादेव आप्पा थापडे, बाबासाहेब शिंदे, प्रशांत निसर्गन, निखिल थापडे, संभाजी गोडसे, बापू शिंदे, विकास देवकते, धमानद शिंदे, पद्माकर साळवे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्व ग्रामस्थांच्या वतीने डॉ. ससाने-इंगोले मॅडम यांचा सन्मान करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच पशुपालकांना वेळेवर आणि दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा मिळाव्यात, अशी अपेक्षाही उपस्थितांनी व्यक्त केली.

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेत बीड जिल्ह्याची दमदार कामगिरी!

जलतरण स्पर्धेत बीडच्या खेळाडूंचा दबदबा; ७ सुवर्ण, ६ रौप्य व १ कांस्य पदकाची कमाई

बीड । प्रतिनिधी

३७ व्या छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२६ चा उद्घाटन सोहळा दि. १७ नोव्हेंबर रोजी बीड पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर उत्साहात पार पडला. सहभागी संघांचे संचलन, मान्यवरांचे मार्गदर्शन, मशाल प्रज्वलन आणि क्रीडाज्योत प्रज्वलन अशा विविध कार्यक्रमांनी उद्घाटन सोहळ्याची



शोभा वाढवली.

या स्पर्धेत बीड, जालना, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण आणि छत्रपती संभाजीनगर शहर अशा पाच पोलीस घटकांतील खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा देत खिलाडूवृत्तीने स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

दरम्यान, ◀◀ पान २ वर

पवनचक्की कंपन्यांच्या मनमानीविरोधात शेतकरीपुत्रांचा एल्गार!

संनियंत्रण समित्या कागदावरच; कंपन्यांना पाठबळ देणाऱ्या महसूल व पोलीस प्रशासनाच्या निषेधार्थ चौसाळा येथे रास्ता रोको आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा परिसरात पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर होत असलेली दडपशाही, आर्थिक लूट, मानसिक छळ आणि विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना खंडणीचे गुन्हे दाखल करण्याच्या दिल्या जाणाऱ्या धमक्यांविरोधात शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने आज दि.१८ बुधवार रोजी चौसाळा बसस्थानकासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

चौसाळा, कानडीघाट, गोलंग्री, माळेवाडी, बोरखेड, घारगाव, रुईगव्हाण, वडवाडी आणि बाभळगाव परिसरात कार्यरत पवनचक्की कंपन्यांच्या कारभाराविरोधात शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. पवनचक्की कंपन्यांची दादागिरी थांबवा, शेतकऱ्यांची लूट बंद करा, कंपन्यांची पाठराखण करणाऱ्या महसूल व पोलीस प्रशासनाचा धिक्कार असो, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.



आंदोलनानंतर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन देण्यात आले. तहसीलदार चंद्रकांत शेळके , नेकनुर पोलिस ठाण्याचे सपोनी मंगेश साळवे यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी नेकनूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

आंदोलनात शेतकरी हक्क मोर्चाचे डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर, अशोक लोढा, डॉ.बाबुराव जोगदंड, डॉ.दिलीप मोटे, सुधाकर गुंजाळ, अशोक जोगदंड, संभाजी कदम,बाळासाहेब मोरे पाटील, सचिन आंधळे, काकासाहेब शिंदे, काकासाहेब जोगदंड, कल्याण महाराज जगताप, श्रीकांत कवडे,विजय झोडगे, माऊली शिंदे, प्रवीण आनेराव,राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक, रामधन जमाले, भीमराव कुटे, रेवण मोरे,यांच्यासह परिसरातील शेतकरी सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांवरील अन्यायाचे गंभीर आरोप!

पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर पुढीलप्रमाणे अन्याय होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

१) शेतकऱ्यांची लेखी परवानगी न घेता थेट शेतजमिनीत विद्युत खांब उभारणे.

२) शेतातून बळजबरीने विद्युत वाहिन्या व पोल उभारण्याचे काम करणे.

३) योग्य मोबदला न देता अथवा वटणार नसलेले धनादेश देऊन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करणे.

४) कामाला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना दमदाटी करून खंडणीचे गुन्हे दाखल

◀◀ पान २ वर

त्रिपुरारी पौर्णिमा, गुरुनानक जयंती निमित्त कंकालेश्वर येथे भव्य दीपोत्सव व महाआरती आयोजन

बीड प्रतिनिधी : -

चला बीडकरांनो एकत्र येऊया, हजारो दिव्यांनी शिवनगरी कंकालेश्वर उजळवूया !

दि.२४ नोव्हें २०२६ रोजी त्रिपुरारी पौर्णिमा व गुरुनानक जयंती निमित्त विशेष भव्य-दिव्य दीपोत्सव व महाआरती चे आयोजन २०२६ हर हर महादेव!

आपली बीड नगरी ऐतिहासिक वारसा लाभलेली, धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेने समृद्ध असलेली शिवनगरी ! याच आपल्या पवित्र बीड नगरीतील श्री क्षेत्र कंकालेश्वर




महादेव मंदिराच्या साक्षीने यंदाच्या कार्तिक 'त्रिपुरारी' पौर्णिमा, कार्तिक पर्व / मास समाप्ती, गुरुनानक जयंती, देव दिवाळी, या निमित्याने दिन विशेष दि. २४ नोव्हेंबर २०२६, वार शुभ मंगळवार रोजी (कार्तिक पर्व समाप्ती काळ) संध्याकाळी ४.०० वाजल्यापासून महाशिव कंकालेश्वर मंदिर बीड, येथे भव्य दीपोत्सव व महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व बीडकर, शिवश्रद्ध, शिवप्रेमी, भाविक-भक्तांनी तसेच समस्त बीडकर नागरिकांनी आवर्जून सहभाग घ्यावा

रोटरी क्लबतर्फे गेवराईत दिवाळीनिमित सूर संगीताची मेजवानी

स्वरसंध्याने रसिकश्रोते सुखावले -उज्वला वनवे

गेवराई । प्रतिनिधी

संगीतामध्ये खूप मोठी जादू आहे आणि ही जादू ज्याला समजली तो खरोखरच भाग्यवान आहे. अशी जादू गेवराई येथे पहावयास मिळत आहे. बीड येथील गीतांजली कराओके क्लब व रोटरी क्लबचे कलावंत गायक आणि स्थानिक कलावंत यांचा सुरेल संगम पहावयास मिळाला. स्वरसंध्याने गान रसिकांची भूक काही प्रमाणात का होईना भागवली. ही गेवराईकरांच्या दृष्टीने चांगली बाब आहे, असे



गौरव उद्गार नाट्य अभिनेत्री ,निवेदिका डॉ. उज्वला वनवे यांनी काढले. रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने १२ नोव्हेंबर २०२६ रोजी दिवाळी आणि पाडव्यानिमित्त गेवराईकरांसाठी लातूर पॅटर्न क्लासेसच्या सभागृहात स्वर संध्या या संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर रोटरी इंटरनॅशनल ३१ ३२ चे माजी प्रांतपाल हरीश मोटवानी, सहप्रांतपाल नितीन गोपन, नाट्य अभिनेत्री डॉ. उज्वला वनवे, जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार, कलावंत व पत्रकार सुशील टकले, रोटरी क्लब ऑफ मिडटाउन बीडचे सचिव मनोज थीगळे , प्रीत कुकडेजा, रोटरी क्लबचे अध्यक्ष गणेश

हिंगणी खुर्द येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते मोफत पाणी पुरवठ्याचा शुभारंभ

हिंगणी खुर्द येथील तरुणांप्रमाणे इतरांनी पुढे यावे - चंद्रकांत शेळके

चौसाळा । प्रतिनिधी

सध्या बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे नागरिकांचे पाण्यासाठी अतोनात हाल होत आहेत. त्यामुळे हिंगणी खुर्द येथील तरुण नवनाथ तांदळे यांनी पुढाकार घेऊन गावकऱ्यांना मोफत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला. मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा शुभारंभ बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या शुभहस्ते दिनांक १८ नोव्हेंबर बुधवार रोजी सकाळी श्रीफळ फोडून करण्यात आला. मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा करत असलेले टँकर भरण्यासाठी किंवा गावकरी म्हणतील त्याप्रमाणे पत्रकार अमोल तांदळे यांनी गावालगत असलेल्या शेतातील बोरवेलचे ऊसाचे पाणी बंद करून दोन तास मोफत पाणी देणार असल्याचे सांगितले.



यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके असं म्हणाले की, हिंगणी खुर्द येथील नवनाथ तांदळे या युवकाने गावकऱ्यांना मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. त्याचे टँकर भरण्यासाठी ज्यांच्या बोअरवेलला पाणी आहे त्यांनी त्यांना मोफत पाणी द्यावे. तसेच हिंगणी खुर्द येथील तरुणांप्रमाणे तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सामाजिक भावनेतून पुढाकार घ्यावा असे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केले. तसेच या दुष्काळी परिस्थितीला हिंगणी खुर्द प्रमाणे सामाजिक भावनेने तालुक्यातील इतर गावातील नागरिकांनी, तरुणांनी पुढाकार घेऊन दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे. यासाठी तहसीलदार म्हणून प्रशासन पूर्णपणे सर्वांच्या सोबत असेल.

यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा गावकऱ्यांच्या वतीने नवनाथ तांदळे यांनी सत्कार केला. तसेच मोफत पाणीपुरवठा सुरू केल्याबद्दल नवनाथ तांदळे यांचा सत्कार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी करून अभिनंदन केले. यावेळी हिंगणी खुर्द येथील पत्रकार अमोल तांदळे, माजी सरपंच रमेश तांदळे, वासुदेव आंधळे, भागवत आंधळे, ग्रामपंचायत सदस्य परसराम तांदळे, गणेश आंधळे, मधुकर तांदळे, पोलीस पाटील अशोक नागरगोजे, यांच्या गावकरी, रावसाहेब तांदळे, राम तांदळे, वामन तांदळे, प्रकाश मुंढे, विजय आंधळे, सूरज बांगर, वामन मुंढे, पिंटू आंधळे, रामदास तांदळे, आबा तांदळे, विठ्ठल तांदळे, प्रदीप आंधळे, अजय बांगर, श्रीकृष्ण तांदळे, रामहरी आंधळे, विकास तांदळे, रवींद्र मुंढे, बाळू आंधळे, भानुदास खेडकर, अनिकेत खेडकर, घनश्याम तांदळे, धनराज तांदळे, चंद्रशेन तांदळे आदींसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंगणे खुर्द येथील तरुणांप्रमाणे तालुक्यातील इतर तरुणांनी नागरिकांनी दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सामाजिक भावनेतून पुढाकार घ्यावा. तसेच मंडळाधिकारी त्याला त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये जाऊन सामाजिक भावनेतून मदतीसाठी पुढे येणाऱ्यांशी चर्चा करून प्रोत्साहन द्यावे त्यासाठी प्रशासन सर्वांच्या पाठीशी आहे.

-चंद्रकांत शेळके (तहसीलदार, बीड)

माझ्या गावातील माता माऊल्यांचे पाण्यासाठी होणारे हाल थांबवण्यासाठी मी टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु माझ्यासारख्या अनेकांनी पुढे येऊन शक्य होईल ती मदत करावी. तसेच ज्यांच्या बोरवेलला, विहिरीला पाणी आहे त्यांनी किमान एक टँकर भरण्यासाठी पाणी मोफत द्यावे ही विनंती.

---- नवनाथ तांदळे, (युवक, हिंगणी खुर्द)

माझे गावालगत शेत आहे सध्या मी माझ्या तोडणीला आलेल्या ऊसाचे पाणी बंद करून नवनाथ तांदळे गावकऱ्यांना मोफत पाणीपुरवठा करत असलेले टँकर भरण्यासाठी दोन तास मोफत पाणी देत आहे. तसेच ऊस तोडणी झाल्यानंतर गावासाठी किमान चार तास कायमस्वरूपी मोफत पाणी देणार आहे.

----अमोल तांदळे (स्थानिक पत्रकार)